दिनांक : १३.१०.२०२६

प्रेस नोट

आज, मंगळवार, दिनांक १३.१०.२०२६ रोजी दुपारी ०५.०० वा. मा.श्री.ओमप्रकाश दिवटे, अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) यांनी कर आकारणी व कर संकलन विभागाकडील मिळकत करापोटी बँकेत वटले नसलेल्या धनादेशांच्या प्रकरणांचा आढावा घेत कर आकारणी व कर संकलन विभाग व विधी विभाग यांचे समवेत संयुक्त बैठक पार पडली.

<u>मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) यांनी प्रशासनातील अधिकारी / कर्मचारी यांना खालीलप्रमाणे निर्देश दिले :</u>

- मिळकत करापोटी अनादरित झालेल्या धनादेशांच्या प्रकरणांत सुमारे १० कोटी रुपयांची वसुली करण्यासाठी कर विभाग व विधी विभागाला तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले.
- दिनांक १ एप्रिल २०२६ पासून आजपर्यंत मिळकत करापोटी प्राप्त झालेले एकूण २,१५० धनादेश (मागणी रक्कम सुमारे ₹१८ कोटी) बँकेत वटले नसल्याने परत आले आहेत. संबंधित मिळकतधारकांना विधी विभागामार्फत नोटिसा बजावल्यानंतर काही मिळकतधारकांनी थकीत रक्कम जमा केली आहे. तथापि, अद्याप सुमारे ४४० मिळकतधारकांकडून रक्कम जमा करण्यात आलेली नसून, या प्रकरणांमध्ये सुमारे १० कोटी रुपयांची वसुली प्रलंबित आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणातील रक्कम वसूल न होणे ही गंभीर बाब असल्याने संबंधित प्रकरणांमध्ये तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश मा. अतिरिक्त आयुक्त (विशेष) यांनी दिले.
- धनादेश अनादरित झालेल्या प्रकरणांत कायदेशीर कार्यवाहीसाठी निर्देश दिले.
- परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ च्या कलम १३८ अन्वये माननीय न्यायालयात प्रकरणे दाखल करण्यासाठी विधी विभागाने कर विभागाकडे आवश्यक कागदपत्रांची मागणी केली होती. तथापि, आवश्यक कागदपत्रे विहित मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे काही प्रकरणांमध्ये पुढील कायदेशीर कार्यवाही करता आली नसल्याचे सांगण्यात आले.
- सदर प्रकरणांमध्ये संबंधित मिळकतधारकांच्या थकीत मिळकत कराचा तपशील व देयकाची प्रत, धनादेशाची मूळ प्रत किंवा उपलब्ध अभिलेखानुसार त्याची प्रत आणि धनादेश अनादरित झाल्याबाबत बँकेचा धनादेश परतावा मेमो (Cheque Return Memo) ही कागदपत्रे कर विभागाने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याशिवाय, विधी विभागामार्फत बजावलेल्या कायदेशीर नोटिशीची प्रत व नोटीस बजावल्याची पोच ही कागदपत्रेही आवश्यक आहेत.
- कागदपत्रे उपलब्ध होण्यास झालेल्या विलंबामुळे काही प्रकरणांमध्ये कलम १३८ अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्याची वैधानिक मुदत संपुष्टात आल्याची बाब बैठकीत निदर्शनास आली. त्यामुळे कर विभागाने सर्व संबंधित प्रकरणांची सविस्तर यादी तयार करून आवश्यक कागदपत्रांसह स्वतंत्र संचिका पुढील चार दिवसांच्या आत विधी विभागाकडे सादर करावी, असे निर्देश देण्यात आले.
- यापुढे धनादेश अनादरित होऊन परत आल्यास, कर विभागाने प्रत्येक प्रकरणासाठी आवश्यक तीन कागदपत्रे संकलित करून स्वतंत्र संचिका तयार करावी. त्यासोबत संबंधित प्रकरणाचा संपूर्ण तपशील, कागदपत्रांची यादी व आवरणपत्र जोडून सदर संचिका वेळेत विधी विभागाकडे सादर करावी. विधी विभागाने स्वतःकडील कायदेशीर नोटीस व तिची पोच संबंधित संचिकेला जोडून, लागू वैधानिक मुदतींचे पालन करून पुढील कायदेशीर कार्यवाही तातडीने करावी. यामुळे भविष्यात कागदपत्रांच्या विलंबामुळे कायदेशीर कार्यवाहीची संधी गमावली जाणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले.
- ज्या प्रकरणांमध्ये कलम १३८ अन्वये कार्यवाहीची वैधानिक मुदत शिल्लक आहे, अशा प्रकरणांमध्ये विधी विभागाने विहित मुदतीत न्यायालयीन कार्यवाही करावी. ज्या प्रकरणांमध्ये सदर मुदत संपुष्टात आली आहे, अशा प्रकरणांमध्ये उपलब्ध तथ्ये व कायदेशीर तरतुदी तपासून योग्य दिवाणी किंवा अन्य कायदेशीर उपाययोजनांद्वारे थकीत रकमेची वसुली करण्याबाबत कार्यवाही करावी, असे निर्देशही देण्यात आले.
- प्रशासकीय खर्चाच्या वसुलीसाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.
- धनादेश अनादरित होऊन बँकेकडून परत आलेल्या प्रकरणांमध्ये संबंधित मिळकतधारकांकडून प्रशासकीय खर्चाची रक्कम वसूल केली जात नसल्याबाबत बैठकीत नाराजी व्यक्त करण्यात आली. प्रत्येक अनादरित धनादेशापोटी सुमारे रुपये ५,०००/- इतकी रक्कम प्रशासकीय खर्चापोटी वसूल करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.
- त्यानुसार, कर विभागाने संबंधित कायदेशीर व प्रशासकीय तरतुदींची पडताळणी करून सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा. तसेच, सदर रक्कम संबंधित मिळकतधारकांच्या पुढील वर्षाच्या मिळकत कराच्या देयकामध्ये स्वतंत्रपणे दर्शवून, नियमानुसार वसूल करता येईल का, याबाबत प्रस्तावात स्पष्ट उल्लेख करावा, असे निर्देश देण्यात आले.
- कागदपत्रे सादर करण्यास विलंब झाल्यास जबाबदारी निश्चित करणार असल्याचे सांगितले.
- धनादेश अनादरित झालेल्या प्रकरणांमध्ये आवश्यक कागदपत्रे विहित मुदतीत विधी विभागाकडे सादर न केल्यामुळे कायदेशीर कार्यवाही प्रलंबित राहिल्याचे आढळल्यास, संबंधित प्रकरणांची पडताळणी करून विलंबाची कारणे निश्चित करावीत. तसेच, कागदपत्रे वेळेत सादर न केल्याबाबत संबंधित जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.
- कर विभाग व विधी विभाग यांनी परस्पर समन्वयाने सर्व प्रलंबित प्रकरणांचा नियमित आढावा घ्यावा आणि थकीत मिळकत कराच्या वसुलीसाठी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर सादर करावा. प्रलंबित रकमेची वसुली वेळेत होण्यासाठी तसेच भविष्यात आवश्यक कागदपत्रांच्या विलंबामुळे कायदेशीर कार्यवाहीची संधी गमावली जाऊ नये, यासाठी दोन्ही विभागांनी आवश्यक दक्षता घेण्याचे निर्देश मा. अतिरिक्त आयुक्त (विशेष) यांनी दिले.

<u>सदर बैठकीस खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.</u>

१. श्री.रवी पवार, उप आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग
२. श्रीमती निशा चव्हाण, मुख्य विधी अधिकारी, विधी विभाग
३. श्रीमती प्राजक्ता भुतडा, सहा.विधी अधिकारी, विधी विभाग
४. श्री सोपान वांजळे, प्रशासन अधिकारी, कर आकारणी व कर संकलन विभाग

तसेच संबंधित प्रकरणांचे कामकाज पाहणारे विधिज्ञ तसेच अन्य संबंधित अधिकारी उपस्थित होते.